# महाराष्ट्रातील संतांचे सामाजिक कार्य

*प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते

बाराव्या शतकापासून खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पुर्नजीवनाला प्रारंभ झाला. संत चळवळ म्हणजे हजारो वर्षानंतर उदयास आलेला मानवतावादी उद्रेक होय. या कालखंडाचा धर्म हाच युगधर्म असला तरी ही चळवळ परमार्थप्रवण व सहिष्णूवादाची चळवळ म्हणून ओळखली जाते. समता, उदारता, मानवता आणि उत्कट ईश्वरभक्ती ही या चळवळीची मुलभूत अंगे होत. संतांच्या चरित्रातून मानवतावादी विचारातून महाराष्ट्र घडला. संतांच्या साहित्याने महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने सांस्कृतिक आणि मानसिक भरण पोषण केले आहे. संतांच्या कार्याच्या मुळाशी जनसामान्याविषयीची कळमळ व तळमळ असलेली दिसते. त्यांच्या विचारांच्या केंद्रस्थानी सामान्य माणूस असून सर्वच संतांनी आयुष्यभर त्यांची चिंता केलेली दिसून येते.

वरील गोष्टी लक्षात घेता १२ व्या शतकानंतर खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या सामाजिक कार्याला सुरुवात झाली असे म्हणने अतिशयोक्तीचे ठरु नये. संतांच्या कार्याकडे सामाजिक दृष्टीकोणातून पाहण्यास १९ वे शतक उजाडले. १९ व्या शतकात ब्रिटिश सत्तेमुळे महाराष्ट्राचा पाश्चात्य संस्कृतिशी संबंध आला. या नव्या विचारामुळे महाराष्ट्राची मानसिकताच बदलून गेली. व्यक्तिस्वातंत्र्य आणि इहवादी दृष्टीकोणातून महाराष्ट्राकडे पाहण्यास सुरुवात झाली. या दृष्टीकोनातून सतंसाहित्याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न महात्मा फुले यांनी आपल्या शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथात करण्याचा प्रयत्न केला आहे. हजरत महंमद पैगंबराचे जहामर्द शिष्य, आर्यभटांचे कृत्रिम धर्मासहित सोरटी सोमनाथा सारख्या मूर्तीचा तरवारीचे प्रहारांनी विध्वंस शुद्र शेतकऱ्यास आर्यांचे ब्रम्हकपटातून मुक्त करु लागल्यामुळे, भट ब्राम्हणांतील मुकुंदराज व ज्ञानोबांनी भागवत बखरीतील काही कल्पित भाग उचलून त्यांचे प्राकृत भाषेत विवेक सिंधु व ज्ञानेश्वर या नावाचे डावपेची ग्रंथ करुन शेतकऱ्यांची मने इतकी भ्रमिष्ट केली की, ते कुराणसहित महंमदी लोकांस नीच मानून त्यांचा उलटा द्वेष करु लागले. नंतर थोडा काळ लोटल्यावर तुकाराम, या नावाचा साधु शेतकऱ्यामध्ये निर्माण झाला. तो शेतकऱ्यांमधील शिवाजीराजास बोध करुन त्यांचे हातून भट ब्राम्हणांच्या त्यांच्या पाशातून सोडविले. या भयास्तव, भट ब्राम्हणांतील अट्टल वेदांनी रामदास स्वामींनी महाधुर्त गागाभट्टाचे संगन्मताने अक्षरशुन्य शिवाजीचे कान फुंकण्याचे सढल ठरवून अज्ञानी शिवाजीचा व निस्पृह तुकारामबुवांचा पुरता स्नेहभाव वाढू दिला नाही. (महात्मा फुले समग्र वाड्मय पृष्ट २६६) अशा रितीने जाती व्यवस्था व सांस्कृतिक शोषणा संदर्भात आपली भूमिका म.फुले यांनी मांडली आहे. ब्रिटिशांच्या विचारामुळे अनेक नव्या संकल्पनांशी मराठी माणसाचा संबंध येत होता. या काळात ब्रिटिश सत्ता भारतात स्थिर झाली होती. ब्रिटिशांच्या नव्या शिक्षण पध्दतीचे विचारांचे नवे पडसाद महाराष्ट्रातील समाजात दिसू लागले. भारताला पाश्चात्याच्या ज्या नव्या संकल्पनांचा परिचय झाला त्यात राष्ट्र आणि इतिहास ह्या नव्या संकल्पना होत्या. राष्ट्र व राष्ट्राचा इतिहास हा समाजाच्या सामाजिक, राजकिय व सांस्कृतिक दृष्टीने महत्वाचा ठरत असतो ही नवी भूमिका महाराष्ट्रात रुजण्यास, प्रारंभ झाला. या दृष्ट्रीने संत साहित्याकडे नव्या दृष्टीकोणातून न्या. रानडे यांनी पाहण्यास प्रयत्न केला आहे.

इ.स. १९९३ च्या नंतरच्या काळात मराठ्यांच्या इतिहासाविषयी रानडे यांनी जी भाषणे दिली ती " Rise of maratha power " या पुस्तकाच्या रुपाने ती १९०० साली प्रसिद्ध झाली. या ग्रंथात रानडे यांनी संतांच्या कार्याविषयीचे विवेचन केले आहे. पंधराव्या शतकाच्या शेवटपर्यंत चालू असलेली धार्मिक चळवळ ही आध्यात्मिक गुणांची मंद गतीने वाढ करीत होती. देशाच्या बोलीभाषेत या चळवळीचे बरेच ग्रंथ लोकांना दिले. एकमेकांना तुच्छ लेखनारी जातीभेदाची तीव्रता पुष्कळशी कमी केली. शुद्र समाजाला जवळजवळ ब्राम्हणांच्या बरोबरीने आध्यात्मिक पुण्याई व सामाजिक महती प्राप्त करुन दिली. ग्रहस्थाश्रमातील नात्याचे पावित्र्य वाढवून बायकांचा दर्जा चढविला. राष्ट्राला जास्त माणूसकीने वागण्याला शिकविले परस्परांच्या सहिष्णुतेने एकमेकांना धरुन चालवण्याची दिशा दाखविली. मुसलमानांच्या सलोख्याचा उपाय सापडून तो बऱ्याच प्रमाणात आमलात आणला गेला. विधी, सोहळे, यात्रा, उपोषणे, विद्वता आणि ध्यान (समाधि) यांना प्रेम व भक्ती यांच्या साह्याने केल्या जाणाऱ्या देवतांच्या पूजेच्या थोरवीपुढे किंमत नाही असे पटविले. नाना दैवतांच्या पुजेतील अत्याचार थांबविले. अशा विविध प्रकारे विचार आणि क्रिया या दोन्ही गोष्टींत कार्यक्षमतेच्या दृष्टीने राष्ट्र उंच पातळीवर चढले आणि परक्यांच्या वर्चस्वातून स्वत:ला सोडवून संघरुपाची देशी सत्ता पुन्हा स्थापन हिंदुस्थानातील दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राला करता आली नाही.

अशा शब्दांत न्यायमूर्ती रानडे यांनी संत साहित्याची सामाजिक फलश्रुती प्रतिपादन केली. एकंदरीत या काळात महाराष्ट्रात अनेक समुह नांदत होते पण समाज नव्हता. येथे वेगवेगळी दैवते, वेगवेगळ्या उपासनापद्धती, वेगवेगळी वेळ घालविण्याची साधने होती. या काळात खऱ्या अर्थाने या काळात सर्वांना एकत्र आणिल असे काही नव्हते. मात्र भक्ती संप्रदायांनी या वेगवेगळ्या समुहांना एकत्र आणून एक समाज निर्माण करण्याचे मोठे कार्य केले. भक्तिपंथांच्या संतांचे साहित्य हे आध्यात्मिक लोकशाहीचे साहित्य आहे. संतांनी खऱ्या अर्थाने ही लोकशाही स्थापन केली. ज्यांनी ही लोकशाही स्थापन केली ते वेगवेगळया स्तारातील होते. सेना नाव्ही गोरा कुभार, संत इ

*श्री गुरुबुद्धि स्वामी महाविद्यालय, पुर्णा जं. जि. परभणी,

ाानेश्वर ब्राम्हण, कुलकर्णी, संत नामदेव, शिंपी संत तुकाराम शुद्र, एकनाथ, रामदास - उच्च वर्गातील, सेना - न्हावी, गोरा - कुंभार, सावता - माळी, नरहरी - सोनार, चोखामेळा - अस्पृश्य, जनाबाई - दासी इत्यादी संत वेगवेगळया जातीधर्मातील असून ते स्वतःची जात विसरुन एकत्र आलेले दिसतात. या काळात ही अशक्य गोष्ट शक्य संतांनी करुन दाखविली आहे. त्यांनी निर्माण केलेले साहित्य, समता, बंधुता व आध्यात्मिक स्वातंत्र यांची निःश्वासितेच आहेत. या साहित्याने समाजाला मातृभाषेविषयी, मराठी भाषेविषयी अस्मिता दिली. संतांनी घेतलेल्या या मानवतावादी व्यापक वर्गाचे न राहता मराठी साहित्य इ ााले अशी एकात्मिक जाणीव संतांनी समाजात निर्माण केली.

संतांच्या सामाजिक कार्याचा वियार करताना अनेक भूमिके बरोबरच संशोधक, अभ्यासक, इतिहासकार वि.का. राजवाडे यांची भूमिका या संदर्भात महत्वाची ठरते. राजवाडे यांचा विचार करतांना आपल्याला त्यांची भूमिका पहिल्यांदा लक्षात घ्यावी लागते. राजवाडे यांनी प्रारंभी संतांविषयी जी मांडणी केली ती वेगळया प्रकारची असल्याचे लक्षात येते. वि.का. राजवडे म्हणतात १२४० ते १५४० या तीन शतकात संतांचेच प्राबल्य महाराष्ट्रात फार होते. संत म्हटला म्हणजे अत्यंत पंगुपणाचा मुंर्तिमंत पुतळाच होय. संतांला खाणे नको, पिणे नको, वस्त्र नको, एक विठोबा मिळाला म्हणजे सर्वकाही मिळाले. ऐहिक सुखदुःखे, ऐहिक उपभोग, ऐहिक व्यवहार, त्यांच्यात मन घालणे हे संतांचे काम नव्हे. इहलोक हा संतांचा नव्हेच. राजा कोणी असो, सारा कोणी घेवो, संतांचे काही काही नाही असल्या या संतमंडळींच्या हाती विचारांची दिशा जावून महाराष्ट्र तीन शतके पंगू बनून राहिले. सनातन धर्माला त्रासून महाराष्ट्रातील लोकांनी जी धर्मक्रांति केली तिचे स्वरुप हे असे होते असे मत वि.का. राजवाडे यांनी मांडला (प्रस्तावना खंड पृ. २६९).

वि.का. राजवाडे यांच्या या मतामुळे संत साहित्याच्या सामाजिक कार्यासंदर्भात एक वाद निर्माण झाला. त्यांच्या मताला पु.ब. शहस्त्रबुद्धे व द.के. केळकर यांनी पाठिंबा दिला. मात्र असे असले तरी स्वतः वि.का. राजवाडे यांच्या मतामध्ये परिवर्तन झाल्याचे दिसून येते. पुन्हा वि.का. राजवाडे म्हणतात. हे ग्रंथकार नसते तर, मराठीची एखादी निराळीच भाषा बनती. आणि निराळी भाषा बनल्यावर मराठ्यांचे राष्ट्र अस`शब्द वापरता आले नसते, इतकेच नव्हे तर हे ग्रंथकार नसते तर सतराव्या शतकात झालेली स्पृहणीय राज्यक्रांती झालीच नसती. अशी विधाने राजवाडे यांनीच केली आहे (प्रस्तावना खंड पृ. ३९५) याच प्रस्तावनेत पुढे चौदाव्या शतकापासूनच्या सामाजिक परिस्थितीचे वर्णन करताना त्या वेळच्या सुधारकांचा व राज्यकर्त्यांचा, मुळ धर्माला, मुळ भाषेला व मुळ आचाराला नष्ट करण्याचा विचार होता.तो महाराष्ट्रातील सुधारकांनी साधुंनी व ग्रंथकारांनी हाणून पाडला. मुर्ति म्हणजे ईश्वराच्या प्रतिमा आहेत. चातुर्वर्ण्यातील सर्वलोक देव आणि धर्म यांच्यापुढे सारखे आहेत. एकच ब्रम्ह सर्वत्र पसरलेले आहे. हया तीन सिद्धांतांचे निरुपण या सुधारक साधूंनी व ग्रंथकारांनी योग्य रितीने केले हे तिन्ही सिद्धांत आपल्या हिंदु धर्माचे मुख्य स्तंभ आहेत हे त्यांनी नाना प्रकारांनी लोकांच्या मनावर बिंबविले (प्रस्तावना खंड पृ ३९७) असे राजवाडे यांनीच म्हटले आहे.

प्रारंभीची राजवाडेंची भूमिका आणि नंतरची भूमिका यात असा फरक जाणवतो. म्हणून संत साहित्याचा राष्ट्रीय चारित्र्याच्या जडणघडणीतील संबंध राजवाडे यांनीच मान्य केला आहे. याचाच अर्थ असा की सामाजिक फलश्रृतीच्या संदर्भात संतसाहित्याचे विचार मुलगामी ठरतो. १९ व्या शतकात महाराष्ट्राला राष्ट्र आणि इतिहास हया दोन नविन संकल्पांचा परिचय झाला असा सुर या काळात निघताना दिसतो. त्यामुळे आधूनिक राष्ट्र आणि राष्ट्रवाद या संकल्पांच्या प्रभावाखाली १९०० ते १९२० या काळात संत साहित्याची सामाजिक कार्य वादग्रस्त ठरले. त्यांनंतरच्या काळात महाराष्ट्राला मार्क्सवादाचा परिचय झाला. त्या बरोबरच गांधीजी आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीमुळे महाराष्ट्राबरोबरच सामाजिक समतेचे मूल्य समाजात प्रभावी होउ लागले. अशा वेगवेगळया पातळीवर चर्चा होउ लागली. प्रत्येक काळात वेगवेगळी मुल्ये समाजात प्रस्थापित होताना दिसतात. परिस्थिती नुसार मूल्ये बदलताना दिसतात. तसे पाहता आधुनिक काळातील, समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय या मुल्यांशी संतांचे कार्य मिळते जुळते दिसते. संत साहित्याच्या सामाजिक कार्याचे मूल्यमापन होत राहिले ही वस्तुस्थिती आहे. तसे पाहिले असता कोणत्याही काळातील सामाजिक प्रक्रिया ही तशी गुंतागुतीचीच असते. समाजात एकाच वेळी अनेक घटना घडत असतात तर कधी कधी त्या परस्पर विरोधी असतात. त्यांचे परस्परांवर गुंतागुंतीचे परिणाम होत असतात. हया सर्व गोष्टी ध्यानात घ्याव्या लागत.

साहित्याची निर्मिती करणारे मानवी मन हेच गुंतागुतीचे आहे. मनाच्या तळाचा पत्ता लागणे अवघड आहे. साहित्य हे समाजाचा आरसा असते. या दृष्टीने संत साहित्याकडे आपण जेंव्हा पाहतो तेंव्हा संत साहित्याच्या सामाजिक कार्यासंबंधीच्या वादग्रस्ततेचे हे एक महत्वाचे कारण आहे. संताच्या सामाजिक कार्याचा आढावा घेताना निश्चितपणे आपला सांगता येईल की, संतांनी आपल्या चरित्रातून कार्यातून, वाड्मयातून, विचारातून सामाजिक बांधिलकीची एक परंपरा सुरु केली आहे असे म्हणने अतिशयोक्तीचे होणार नाही. त्याचे कारण छत्रपती शिवाजी महाराजासारखा जानता राजा या महाराष्ट्रात जन्माला आला. जगाला त्या काळात आदर्श ठरावा असा नवा दृष्टीकोण या जनतेच्या राजाने समाजाला दिला. दुसरें असे की पाश्चिमात्यांचा परिचय होताच महाराष्ट्रातल्या पहिल्या पिढीने मराठी संस्कृतिचा अस्मितेचा जेंव्हा शोध घेण्यास प्रारंभ केला तेंव्हा त्यांचे स्त्रोत या काळातील समाज सुधारकांच्या हाती आलेला दिसतात. समाज सुधारकांना खऱ्या अर्थाने जी प्रेरणा मिळाली ती संतांच्या कार्यातून आणि तिच परंपरा आजतागायत सुरु आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आजही आजचा वक्ता, लेख, विचारवंत आपल्या आपल्या भाषणाची प्रास्ताविकाची विचाराची सुरुवात, संतांच्या एखाद्या चरनाने करतात. हेच संतांच्या कार्याचे मोठेपण व वेगळेपण नम्रपणे कबुल करता येईल.

## संदर्भ ग्रंथ

१) संत वाड्मयाची सामाजिक फलश्रुती - गं.बा. सरदार २) संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य - सुनथनकर